।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ७४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com


**✻ सुविचार ✻**

ज्याला मन जिंकता आले त्याने माणूस जिंकला,
आणि ज्याने मन जिंकले त्याने जग जिंकले.

## महाप्रसाद, लंगर, भंडाऱ्यांवर एफडीएची नजर

**सर्वधर्मीय सणांसाठी स्थायी आदेश । भेसळ रोखण्यासाठी २१ दिवस आधीपासून ३० दिवसांपर्यंत विशेष मोहीम**

**● मुंबई । वीरभूमी–**

हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा सर्व धर्मांच्या सण आणि उत्सवाच्या वेळी अन्नपदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने स्थायी आदेश काढले आहेत. 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स' म्हणून वर्षभर लागू असणाऱ्या या नव्या आदेशांमुळे सण व उत्सवांच्या काळात मिळणाऱ्या महाप्रसाद, लंगर आणि भंडा–यांमधील अन्नाची गुणवत्ताही अन्न व औषध प्रशासनाकडून तपासली जाणार आहे.

सणासुदीच्या काळात मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा तसेच मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मियांच्या सणांमध्ये मांसाहारी पदार्थांची मागणी मोठया प्रमाणात वाढते. त्यामुळे या काळात भेसळही मोठ्या प्रमाणात होते. हे रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने वर्षभराचे विशेष कॅलेंडरच तयार केले आहे. सर्वधर्मीय सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण करण्यात आले. यामध्ये गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ आणि नववर्ष पूर्वसंध्येचा प्रथम श्रेणीत (राज्यव्यापी) समावेश आहे. मकर संक्राती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी वारी, श्रावण मास, दहीहंडी आणि गुरुनानक जयंती यांचा द्वितीय श्रेणीत (प्रादेशिक) तर स्थानिक जत्रा, पालखी सोहळे आणि उरुस यांचा तृतीय श्रेणीत समावेश करण्यात आला.

ही धडक मोहीम चार टप्प्यांत राबवली जाणार असून, सणाच्या २१ दिवस आधी पूर्वतयारी सुरू होईल आणि सण संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत ती सुरू राहील. पहिल्या टप्प्यात विशेष पथकांची नियुक्ती केली जाईल, तर दुस–या टप्प्यात घाऊक मंडया आणि वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी पहाटे



विशेष नाका तपासणी होईल. तिसऱ्या टप्प्यात सणाच्या दिवशी भरारी पथकांद्वारे प्रत्यक्ष ठिकाणांची सरप्राईज तपासणी केली जाईल, आणि चौथ्या टप्प्यात दोषींवर कायदेशीर खटले दाखल करून अहवाल आयुक्तांकडे सादर केला जाईल.

### कडक अंमलबजावणी, कठोर कारवाई होणार

■ उपवासाचे पदार्थ, दुग्धजन्य उत्पादने, मांस, पाणी, बर्फ तसेच मिठाईवरील चांदीचा वरख आणि खाद्यरंगांच्या प्रमाणावरही काटेकोर नजर ठेवली जाणार आहे. ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म, आयात अन्नपदार्थ आणि बेकरी उत्पादनांच्या बाबतीत झिरो टॉलरन्स धोरण राबवले जाईल. तसेच कारवाईनंतर १४ दिवसांच्या आत दोषींवर न्यायालयात खटले दाखल केले जातील. या स्थायी आदेशामुळे आता प्रत्येक सणासाठी वेगळा आदेश काढण्याची गरज उरणार नाही.

### वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

**श्रीकृष्ण**

अवघड काम सोपे
कितीही असू द्या प्रश्न
उत्तर त्यांना ठाऊक
ज्यांना समजले श्रीकृष्ण !
बासरी कुठे? सुदर्शन कुठे?
काळ सारी मोहमाया
मनातला भाव खरा
संपणारी असते काया

## SPOT NEWS

### अयोध्या राम मंदिर ट्रस्टच्या सीईओपदी जितेंद्र मिश्रा

**● अयोध्या** – राम मंदिर ट्रस्टच्या नवीन सीईओंची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय हवाई दलाचे निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची राम मंदिर ट्रस्टच्या नवीन सीईओं पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी पश्चिम कमांडचे नेतृत्व केले होते. महेश भागचंदका, मदन मोहन पांडे आणि निर्मला यादव या तीन नवीन विश्वस्तांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. राम मंदिर ट्रस्टच्या इतिहासात पहिल्यांदाच एका माजी उच्च लष्करी अधिकाऱ्यावर मंदिर व्यवस्थापनाची इतकी महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मंदिर परिसराचा सतत होणारा विस्तार, त्याची विकसित होत असलेली पायाभूत सुविधा आणि त्याची अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली लक्षात घेता, एका खंबीर, अनुभवी आणि कार्यक्षम प्रशासकाची गरज खूप पूर्वीपासून भासत होती. त्यामुळे, माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची सीईओ म्हणून नियुक्ती करणे हा एक महत्त्वपूर्ण निर्णय मानला जात आहे.

### देशातील बँक कर्मचारी हे लोकसेवक नाहीत

**● नागपूर** – भारतीय स्टेट बँकेचा कर्मचारी हा भारतीय दंड संहिता (आयपीसी) मधील कलम २१ नुसार 'लोकसेवक' ठरत नसल्याने त्याच्यावर झालेल्या कथित हल्ल्याप्रकरणी कलम ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. न्या. मेहरोझ पठाण यांनी अकोला येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाचा आदेश रद्द करताना हे निरीक्षण नोंदवले. अकोला जिल्ह्यातील बार्शी टाकळी येथील प्रतिमा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मधुकर पवार यांनी या प्रकरणात फौजदारी पुनर्विचार अर्ज दाखल केला होता. अतिरिक्त सत्र न्यायालय, अकोला यांनी १ नोव्हेंबर २०२५ रोजी पवार यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळून त्यांच्याविरुद्ध आयपीसी कलम ३५३ अंतर्गत आरोप निश्चित केला होता. या आदेशाला पवार यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यांचे म्हणणे होते की, या प्रकरणातील तक्रारदार हा भारतीय स्टेट बँकेचा कर्मचारी असून तो आयपीसी कलम २१ नुसार लोकसेवक ठरत नाही. त्यामुळे कलम ३५३ चा गुन्हाच लागू होत नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला. पवार यांच्या वतीने दिल्ली उच्च न्यायालयाच्या रघुनाथ राय कुमार तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या एन. वाघुल प्रकरणातील निकालांचा आधार घेण्यात आला. या निकालांमध्ये बँक कर्मचाऱ्यांना आयपीसी कलम २१ च्या अर्थाने लोकसेवक मानता येणार नाही, अशी भूमिका मांडण्यात आली होती. दुसरीकडे, सरकारच्या वतीने एसबीआय कर्मचारी लोकसेवक असल्याचा दावा करण्यात आला. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सीबीआय, बँक सिक्युरिटीज अँड फ्रॉड सेल विरुद्ध रमेश गेल्ली या प्रकरणातील निर्णयाचा आधार घेण्यात आला.

## नगरसेविकांच्या पतींचा कारभारात हस्तक्षेप

**नगराध्यक्षा माया मुंढे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन । चौकशी करून कारवाईची मागणी**

**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव नगरपरिषदेच्या दैनंदिन कामकाजात काही महिला नगरसेविकांचे पती तसेच काही नगरसेवकांकडून हस्तक्षेप केला जात असून, बेकायदेशीर कामांसाठी दबाव, दमदाटी तसेच खोट्या तक्रारी केल्या जात असल्याचा आरोप नगराध्यक्ष माया अरुण मुंढे यांनी केला आहे. या प्रकरणांची सखोल चौकशी करून पारदर्शक कारभारासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुंढे यांनी निवेदनात म्हटले आहे की, २०२५ मध्ये झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत आपली जनतेतून लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. नगरपरिषदेत विविध पक्षांचे नगरसेवक असून, शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे अपेक्षित आहे. शासनाकडून मिळणारा निधी शहरातील सर्व प्रभागांना गरजेनुसार व समान पद्धतीने उपलब्ध करून देण्याची आपली भूमिका आहे. मात्र, काही जणांकडून वैयक्तिक अथवा राजकीय हितासाठी दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

काही महिला नगरसेविकांचे पती नगरसेवक असल्याचा अधिकार गृहीत धरून नगरपरिषदेत येतात. तसेच कर्मचारी व नगराध्यक्षांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात. कामकाजाबाबत खोट्या तक्रारी करून बदनामी तसेच मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

उपनगराध्यक्ष सिराज पटेल पदावर असताना त्यांचे पुत्र ताहेर पटेल हे स्वतः उपनगराध्यक्ष असल्याप्रमाणे नगरपरिषदेत येऊन उपनगराध्यक्षांच्या दालनात बसून कारभार करीत असल्याचा आरोपही मुंढे यांनी केला आहे. तसेच ताहेर पटेल यांनी स्वतः उपनगराध्यक्ष असल्याचे दर्शविणारे फलक शहरात लावले असल्याचे नमूद करून, या प्रकाराची चौकशी करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नगरपरिषदेचा कायदेशीर व पारदर्शक कारभार करण्याचा आपण सातत्याने प्रयत्न करीत असून, कोणत्याही नगरसेवकाच्या कामात अडथळा निर्माण करण्याचा अथवा वैयक्तिक आकस ठेवण्याचा प्रश्न नाही. मात्र, वारंवार होणाऱ्या तक्रारी व दबावामुळे कारभारावर परिणाम होत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणांची चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी आणि बेकायदेशीर हस्तक्षेप करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी मुंढे यांनी केली आहे.

### आरोप तथ्यहीन : सिराज पटेल

■ यापूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीसह इतर मोठ्या संस्थांमध्ये पदावर काम केले आहे. त्यामुळे संस्थेच्या कामकाजाचा मला अनुभव आहे. माझ्या मुलानेही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये महत्त्वाचे पद भूषविले आहे. मात्र, तो माझ्या कामात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करीत नाही. त्यामुळे माझ्या मुलावर करण्यात आलेले आरोप तथ्यहीन आहेत.

**– सिराज पटेल,**
उपनगराध्यक्ष, नगरपरिषद, शेवगाव

## 'ईडी'चा मोर्चा आता बोगस टोल वसूलीकडे

**महाराष्ट्र, जम्मू, मध्य प्रदेशसह ७ राज्यांत छापेमारी**

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

गैरव्यवहार झाल्यास ईडीकडून सातत्याने कारवाई केली जाते. त्यातच आता बोगस टोल वसुली आणि सरकारी खात्यांमधून निधीच्या कथित गैरव्यवहाराप्रकरणी ईडीने एक मोठी मोहीम सुरू केली. ईडीच्या लखनौ विभागीय कार्यालयाच्या एका पथकाने पीएमएलए अंतर्गत १४ ठिकाणी एकाच वेळी शोधमोहीम सुरू केली.

ईडीची ही मोहीम उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, जम्मू, मध्य प्रदेश, एनसीआर आणि कोलकाता येथे राबवली जात आहे. तपासात असे उघड झाले आहे की, विविध एनएचएआय टोल प्लाझावर अनधिकृत सॉफ्टवेअरचा वापर केला जात होता. या सॉफ्टवेअरचा वापर खऱ्या टोल पावत्यांऐवजी बोगस किंवा अनधिकृत पावत्या तयार करण्यासाठी केला जात होता आणि टोलच्या रकमेचा काही भाग सरकारी खात्यांमध्ये नोंद होण्यापूर्वीच वळवला जात होता.



ईडीच्या माहितीनुसार, फॉरेन्सिक तपास आणि एनएचएआयच्या नोंदींनी अशा सॉफ्टवेअरच्या वापराचा दुजोरा दिला आहे. याच्या आधारे, पुढील तपासासाठी ईडीने विविध ठिकाणी छापे टाकले आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, डिजिटल आणि कागदोपत्री पुरावे हस्तगत करणे, या फसवणुकीतून फायदा झालेल्यांना ओळखणे आणि गुन्ह्यातून मिळालेल्या पैशांचा माग काढणे, हे या छाप्यांचे उद्दिष्ट आहे.

यापूर्वीही थेट कोर्टाने कारवाई केली आहे. राष्ट्रीय महामार्गासाठी भूसंपादन कमी दरात केल्याप्रकरणी वाशिम जिल्हा न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला मोठा धक्का दिला. महामार्गासाठी संपादित जमिनीच्या दराचे सुधारित आदेश दिल्यानंतरही मोबदला दिला नाही. त्यावरून वाशिम जिल्ह्यातील धुमका–तोंडगाव टोल प्लाझा जप्त करण्याचा ऐतिहासिक आदेश दिला.

शेतकऱ्यांची नुकसानभरपाई वसूल होण्यासाठी न्यायालयाकडून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचा टोल प्लाझा जप्त होण्याची ही देशातील पहिलीच वेळ असू शकते, असे पक्षकाराचे वकील ॲड. उदय देशमुख यांनी सांगितले. या प्रकरणामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर मोठी नामुष्की ओढवली.

## नगर-बीड-परळी रेल्वेसाठी ५०.४० कोटींचा निधी

**राज्य शासनाची मंजुरी । २६१.२५ कि.मी. मार्गाच्या उर्वरित कामांना मिळणार गती**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रकल्पातील राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक सहभागांतर्गत २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी ५०.४० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय परिवहन विभागाने जारी केला आहे. अहमदनगर–बीड–परळी वैजनाथ परिसरातील दळणवळण व्यवस्था सक्षम करण्यासाठी २६१.२५ कि.मी. लांबीचा ब्रॉडगेज रेल्वेमार्ग उभारण्यात येत आहे. प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार एकूण अंदाजित खर्च ४ हजार ८०५.१७ कोटी रुपये झाला आहे. त्यापैकी राज्य शासनाचा ५० टक्के आर्थिक सहभाग म्हणजे २ हजार ४०२.५९ कोटी रुपये निश्चित करण्यात आला आहे.

२०२५–२६ या आर्थिक वर्षात राज्य शासनाने या प्रकल्पासाठी २५० कोटी रुपयांचा निधी वितरित केला होता. आतापर्यंत राज्य शासनाकडून प्रकल्पासाठी एकूण २ हजार ३४१.२३ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. राज्य शासनाचे ६१.३६ कोटी रुपयांचे दायित्व शिल्लक होते.

मध्य रेल्वेने प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केल्यानंतर राज्य शासनाने शिल्लक दायित्वापैकी ५०.४० कोटी रुपये मध्य रेल्वेच्या मुख्य लेखा अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाने मध्य रेल्वेने मागितलेल्या निधीला तातडीने मंजुरी दिल्याने रेल्वेमार्गावरील उर्वरित कामांना अधिक वेग मिळण्याची अपेक्षा आहे. अहमदनगर–बीड–परळी रेल्वे प्रकल्पामुळे मराठवाडा आणि अहिल्यानगर परिसरातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होऊन आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळणार आहे.

## अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात सरकारकडून माहिती दडवण्याचा प्रयत्न : नाना पटोले

**● मुंबई । वीरभूमी–**

दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी विरोधकांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या दुर्घटनेबाबत पोलिसांत अद्याप एफआयआर नोंदवण्यात न आल्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आता काँग्रेसनेही जाहीरपणे उपस्थित केले आहे.

अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणावर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवत आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतलेली भूमिका अत्यंत योग्य आणि रास्त आहे.

सध्या सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे जे आमदार सत्तेत आहेत, त्यांनी या प्रकरणावर गुन्हा का दाखल झाला नाही, अशी कोणतीही भूमिका अद्याप मांडलेली नाही. त्यांच्या आमदारांनी एफआयआरची साधी मागणीही केली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात काय गोम दडली आहे, हे कळायला मार्ग नाही.

देशाचा जीडीपी वाढल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'गुड न्यूज'वर नाना पटोले यांनी जोरदार टीका केली. पंतप्रधानांनी सोशल मीडियावर जीडीपी वाढल्याचा आनंद व्यक्त केला, पण देशभरातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनीच या दाव्यांची पोलखोल करत त्यांना ट्रोल केले आहे.

जर भारताचा जीडीपी ७.८ टक्के इतका प्रचंड वाढला असेल आणि जागतिक पातळीवर देश अव्वल ठरत असेल, तर देशात महागाई का वाढत आहे? बेरोजगारी का संपलेली नाही? शेतकरी आत्महत्या का करत आहेत? जर अर्थव्यवस्था इतकी बळकट झाली असती, तर देशात सगळीकडे आलबेल वातावरण असायला हवे होते. जनतेसमोर खोटे आकडे फेकून दिशाभूल केली जात आहे, असा थेट निशाणा पटोले यांनी साधला.

## सरकारी शाळांत बाहेरच्या व्यक्तींना आता 'नो एन्ट्री'

**सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका फेटाळली । संबंधित राज्याने काढलेले आदेश कायम राहणार**

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

राजस्थान, उत्तर प्रदेशातील सरकारी शाळांमध्ये पत्रकार, युट्यूबर, समाजमाध्यमांशी संबंधित व्यक्ती तसेच नागरी समाज संघटनांच्या प्रवेशावर घालण्यात आलेल्या निर्बंधांविरोधातील जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे संबंधित राज्यांनी जारी केलेले आदेश सध्या कायम राहणार आहेत. १ सप्टेंबरच्या आदेशात न्यायालयाने, 'भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास आम्ही इच्छुक नाही,' असे नमूद केले.

राजस्थानमध्ये 'शाळा दुरुस्त करा' मोहिमेअंतर्गत सरकारी शाळेची पाहणी करणा–या कार्यकर्त्यांवर अलीकडेच हल्ला झाला होता. या पार्श्वभूमीवर न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा आहे.

राजस्थानच्या माध्यमिक शिक्षण संचालकांच्या १६ ऑगस्टच्या परिपत्रकानुसार, सरकारी शाळेत प्रवेश करण्यासाठी बाहेरील व्यक्तींना मुख्याध्यापकांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. तसेच छायाचित्रण, चित्रीकरण, मुलाखत, ध्वनिमुद्रण आणि थेट प्रक्षेपणासाठीही पूर्वलिखित परवानगी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याला या याचिकेत आव्हान देण्यात आले होते. याचिकेत अयोध्येच्या जिल्हा मूलभूत शिक्षण अधिका–यांनी १९ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या आदेशालाही आव्हान देण्यात आले होते.

विधि विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे नियमन वा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय) व राज्य बार कौन्सिलला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा अधिकार संबंधित शिक्षणसंस्थेलाच असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हैदराबादच्या नालसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांच्या प्रस्तावित दीक्षांत समारंभातील सहभागाला आक्षेप घेतला होता. त्यावर बीसीआयने नालसारच्या



विद्यार्थ्यांची वकील म्हणून नोंदणी तूर्तास थांबवण्याचे निर्देश दिले होते.

# SPOT NEWS

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत दहीहंडीचा जल्लोष!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राधा आणि श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी, कृष्णजन्माची गीते तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि जल्लोषमय झाले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी हिंदी–मराठी गीतांवर नृत्य, नाट्यरूप सादरीकरण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. चिमुकल्यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. शाळेच्या अंगणात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. फुले व रंगीबेरंगी फुग्यांनी परिसराची सुंदर सजावट करण्यात आली होती. दहीहंडी फोडण्याच्या क्षणी 'हाथी घोडा पालखी... जय कन्हैया लाल की!' या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दणाणून गेला. लहानग्या गोविंदांच्या उत्साहात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकही सहभागी झाले. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक महादेव भद्रे, प्राथमिकच्या शिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, सोनाली अनभुल, रूपाली वाबळे, कांचन मदने, भारती सुसरे, भाग्यश्री लोंढे, कविता हिरणवळे, इंदुमती दरेकर, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे, सौ. जगताप, बिडवे मावशी तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, दहीहंडी हा केवळ धार्मिक उत्सव नसून एकतेचे प्रतीक आहे. सण–उत्सवांच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या एकात्म भारताचे दर्शन घडते. समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम अशा उत्सवांमधून होते. विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण करण्याबरोबरच एकात्मतेची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## गणेशोत्सवात महिलांची कुचंबणा टाळण्यासाठी अहिल्यानगरात फिरती स्वच्छतागृहे उभारा!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
गणेशोत्सवाच्या काळात अहिल्यानगर शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने महिलांसाठी पुरेशी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील प्रमुख गणेश मंडळांजवळ तसेच विसर्जनस्थळी महानगरपालिकेच्या वतीने फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अहिल्यानगर शहरात लवकरच सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून, शहरातील विविध गणेश मंडळांनी उत्सवाची तयारी सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील आकर्षक देखावे पाहण्यासाठी तसेच गणेश विसर्जनाच्या मिरवणुका पाहण्यासाठी अहिल्यानगर शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक शहरात दाखल होतात. यामध्ये महिला व मुलींची संख्याही मोठी असते. मात्र, शहरातील अनेक भागांत महिलांसाठी पुरेशा सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवाच्या काळात ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने महापालिका प्रशासनाने आतापासूनच आवश्यक नियोजन करावे, अशी मागणी झिंजे यांनी केली आहे. अहिल्यानगर शहरातील बाजारपेठा, प्रमुख चौक आणि गर्दीच्या भागांमध्ये विविध कामांसाठी मोठ्या संख्येने महिला येत असतात. मात्र, सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असल्यामुळे महिलांना अनेकदा गैरसोयीचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवाच्या काळात शहरात नागरिकांची गर्दी अनेक पटींनी वाढते. त्यामुळे महिलांसाठी स्वच्छतागृहांचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहरात येणाऱ्या महिला तसेच विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहासारखी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांची कुचंबणा होणे ही गंभीर बाब आहे, असे झिंजे यांनी निवेदनात नमूद केले आहे. यावर्षीच्या गणेशोत्सवाच्या काळात शहरातील प्रमुख गणेश मंडळांच्या परिसरात महानगरपालिकेने फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ स्वच्छतागृह उभारून न थांबता त्याठिकाणी पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करावी. तसेच स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेचे कर्मचारी नियुक्त करावेत, अशीही मागणी झिंजे यांनी केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गणेश विसर्जनाच्या दिवशी शहरातील विविध विसर्जन विहिरी आणि संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या दिवशी महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि कुटुंबांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित असतात. त्यामुळे विसर्जन विहिरी असलेल्या ठिकाणीही फिरती स्वच्छतागृहे उभारावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# पाथर्डीत चारा छावण्या सुरू करा

### मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांची तहसीलदारांकडे मागणी



**● पाथर्डी । वीरभूमी –**
यावर्षी पावसाने पाठ फिरवल्याने पाथर्डी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तालुक्यात पाण्याचे टँकर सुरू करण्याबरोबरच जनावरांसाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी तहसीलदार उद्धव नाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पालवे यांनी म्हटले आहे की, यंदा तालुक्यात अत्यल्प पाऊस झाल्याने दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक तलाव व विहिरी कोरड्या पडल्या असून, पाण्याअभावी नागरिकांचे तसेच चाऱ्याअभावी जनावरांचे हाल होत आहेत. त्यामुळे मागणी होताच आवश्यक ठिकाणी टँकर सुरू करावेत. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कोणताही विलंब न करता त्यास तातडीने मंजुरी देऊन पाणीपुरवठा सुरू करावा.

तसेच जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी तालुक्यात आवश्यक त्या ठिकाणी चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करण्याची गरज आहे. येत्या १५ ते २० दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने आतापासूनच नियोजन व कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी प्रशासनाने मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. अन्यथा आंदोलनाची वेळ येऊ नये, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी उपजिल्हाध्यक्ष देविदास हंडाळ, तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, अक्षय उराडे, संतोष पवार, सरपंच अशोक गाडे, सरपंच दादासाहेब शेंबडे, नवनाथ वाघ, ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर तिरखुंडे, बबन शिंदे, सुभाष शिंदे, राजेंद्र खेडकर यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## महागाईच्या विरोधात राष्ट्रवादीच्या महिला रस्त्यावर; जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
केंद्र व राज्य सरकारच्या महागाईविरोधी धोरणांचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी महागाई नियंत्रणासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सर्वसामान्य नागरिक, महिला गृहिणी, शेतकरी, कामगार तसेच मध्यमवर्गीय कुटुंबे वाढत्या महागाईच्या तडाख्याने त्रस्त झाली आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, घरगुती खर्चातील वाढ आणि उत्पन्नाच्या तुलनेत वाढणारा खर्च यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. महागाईचा सर्वाधिक परिणाम घर चालविणाऱ्या महिलांवर होत असून स्वयंपाकघराचे बजेट सांभाळताना महिलांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासनाने केवळ आश्वासने न देता महागाई नियंत्रणासाठी ठोस आणि तातडीची पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. साखर, खाद्यतेल, डाळी, धान्य, भाजीपाला यांसह जीवनावश्यक वस्तूंचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणावेत, घरगुती गॅसच्या दरात मोठी कपात करावी, तसेच पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून इंधनाचे दर कमी करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. महागाईच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी यापेक्षाही तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

यावेळी महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, उपाध्यक्ष वेणूबाई वाणी, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, वर्षा सगळगिरे, अलका वाकडे, अर्चना रत्नपारखे, अर्चना शिंदे, गायत्री गायकवाड, कोमल मस्के, सायरा सय्यद, रशीदा शेख, जायदा मिर्झा आदी उपस्थित होत्या.

## झिरपे वस्ती शाळेचे किशोर मिसाळ यांना जिल्हा शिक्षक पुरस्कार जाहीर

**● शेवगाव । वीरभूमी–**
तालुक्यातील खरडगाव येथील झिरपे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किशोर एकनाथ मिसाळ यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा जिल्हा शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या ५ सप्टेंबरला शिक्षकदिनी लोणी जि. अहिल्यानगर येथे महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.



सुसरे (ता. पाथर्डी) येथील रहिवासी असलेले मिसाळ हे गेल्या ३० वर्षापासून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत. त्यांनी शिक्षक म्हणून आजवर जेऊर हैबती, आपेगाव, चितळे वस्ती वरूर येथे अध्यापनाचे उत्कृष्ट काम केले. खरडगाव येथील झिरपे वस्ती जि. प. प्राथमिक शाळेत त्यांनी शाळेच्या भौतिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी भरीव काम केल्याने त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. मुख्यत्वे मिशन आरंभ शिष्यवृत्ती, दप्तरमुक्त आनंददायी शनिवार, स्पर्धा परीक्षा जादा तासिका, क्षेत्रभेटी, शिवार फेरी, शैक्षणिक सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध गुणदर्शन, विज्ञान प्रदर्शन भेट, मुलाखती, महावाचन, वृक्षारोपण, मिशन आपुलकी, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान सहभाग, युट्युब वाहिनी व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व्हिडिओ तसेच स्लाईड्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी भरीव काम केले. सातत्याने सामाजिक, धार्मिक कार्यक्रमात तसेच उपक्रमात सहभागी होत गरजू, गरीब विद्यार्थ्यांना वैयक्तिक खर्चातून शालेय साहित्याचे वाटप, आर्थिक मदत व दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यासाठी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे.

# विद्यार्थ्यांच्या संशोधनाला संजीवनीचे बळ

### धनश्री देवकर व स्वस्तिका जगताप यांच्या संशोधनाची जागतिक एआय परिषदेसाठी निवड

**● कोपरगाव । वीरभूमी –**
ग्रामीण भागात राहून अभियांत्रिकी व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे संशोधन पेपर जागतिक स्तरावरील परिषदांमध्ये प्रसिद्ध व्हावेत, ही माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांची विचारधारा होती. संजीवनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या माध्यमातून ही विचारधारा प्रत्यक्षात आणली असून, त्यांच्या संशोधनाला संजीवनीचे मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले.



तालुक्यातील टाकळी येथील धनश्री सुनील देवकर आणि संवत्सर येथील स्वस्तिका कुलदीप जगताप या विद्यार्थीनी संजीवनी विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. त्यांनी संशोधित केलेल्या पेपरची ऑक्सफर्ड विद्यापीठ, अमेरिका येथे होणाऱ्या जागतिक एआय परिषदेत मांडणी होणार आहे. याबद्दल धनश्री सुनील देवकर हिचा संजीवनी उद्योग समूह व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. त्यावेळी बिपीनदादा कोल्हे बोलत होते.

बिपीनदादा कोल्हे म्हणाले, या दोन्ही विद्यार्थीनींनी संजीवनी विद्यापीठाचे 'रूरल टू ग्लोबल' हे घोषवाक्य खऱ्या अर्थाने सार्थ ठरविले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांतील तसेच इतर मुला–मुलींना अभियांत्रिकी, तांत्रिक, वैद्यकीय, व्यवस्थापन, औषधनिर्माण, सैनिकी आदी क्षेत्रांतील दर्जेदार शिक्षण मिळावे, हे स्व. शंकरराव कोल्हे यांचे ४४ वर्षांपूर्वीचे स्वप्न होते.

हे स्वप्न साकारण्यासाठी त्यांनी संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या. केजीपासून पीजीपर्यंतचे शिक्षण, नामांकित अभ्यासक्रम आणि उच्चशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळेच धनश्री देवकर व स्वस्तिका जगताप या कमी वयाच्या विद्यार्थीनींना जगभरातील १६ उमेदवारांमध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठातील जागतिक परिषदेत संशोधन पेपर सादर करण्याची संधी मिळाली आहे.

या संधीचे विद्यार्थिनींनी सोने करून स्वतःसह परिसराचे ज्ञान वाढवावे आणि इतर विद्यार्थ्यांनीही नाव लौकिकास्पद कामगिरी करावी, असे आवाहन बिपीनदादा कोल्हे यांनी केले.

धनश्री देवकर ही सहकाररत्न शंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघाचे अध्यक्ष अंबादास देवकर यांची नात आणि माजी सभापती सुनील देवकर यांची कन्या आहे. धनश्री देवकर व स्वस्तिका जगताप यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# श्रीतिलोकच्या नवनियुक्त शिक्षकांचा शब्दगंधतर्फे सन्मान

### भारत गाडेकर, सुधाकर सातपुते व बाळासाहेब गांगुर्डे यांचा सत्कार । विद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी कार्य करण्याची ग्वाही

**● पाथर्डी । वीरभूमी –**
श्री तिलोक जैन विद्यालयातील विविध पदांवर नियुक्त झालेल्या तीन शिक्षकांचा शब्दगंध साहित्यिक परिषद, पाथर्डी शाखेच्या वतीने सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. भारत गाडेकर यांची उपमुख्याध्यापकपदी, सुधाकर सातपुते यांची पर्यवेक्षकपदी, तर बाळासाहेब गांगुर्डे यांची प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे होते. यावेळी बोलताना त्यांनी सत्कारमूर्तींनी विद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय तसेच विविध उपक्रमांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला. त्यांच्या अनुभवाचा, कार्यक्षमतेचा आणि नेतृत्वगुणांचा विद्यालयाच्या प्रगतीस निश्चितच लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शब्दगंध साहित्यिक परिषद, पाथर्डी शाखेचे तालुकाध्यक्ष तथा माजी प्राचार्य अशोक दौंड यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी नव्या जबाबदारीच्या माध्यमातून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी अधिक जोमाने कार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी विजय घोडके, सुनील शेटे, बाळासाहेब कुळधरण, वैभव साप्ते, बंडूशेठ दानापुरे, डॉ. अशोक कानडे, डॉ. अशोक डोळस, अंबादास साठे, राजेंद्र हंडाळ, रामदास जेधे, सुभाष भागवत, डॉ. तुकाराम नेहरकर, डॉ. पियुष गाडेकर आदींनी सत्कारमूर्तींचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



सत्काराला उत्तर देताना नवनियुक्त उपमुख्याध्यापक भारत गाडेकर, पर्यवेक्षक सुधाकर सातपुते आणि बाळासाहेब गांगुर्डे यांनी शिक्षक, पदाधिकारी व सहकाऱ्यांच्या सहकार्याने विद्यालयाचा शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख अधिक उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. अनिल पानखडे यांनी केले, तर आभार चंद्रकांत उदागे यांनी मानले.

# स्नेहालयच्या विद्यार्थ्यांचा आंतरशालेय स्पर्धांमध्ये डंका!

### वक्तृत्व व प्रॉडक्ट डेव्हलपमेंटमध्ये प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक । सर्जनशीलता अन् आत्मविश्वासाला दाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणाऱ्या स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आंतरशालेय स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी केली. इंग्रजी वक्तृत्व आणि प्रॉडक्ट डेव्हलपमेंट स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवत शाळेच्या यशात मानाची भर घातली.

श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुरुवारी विविध आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९.३० ते सायंकाळी ४.३० या वेळेत झालेल्या स्पर्धांमध्ये विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्नेहालयच्या विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभागी होत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली.

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत अश्री केदार (इयत्ता ६ वी) व आर्यन पुरोहित (इयत्ता १० वी) यांनी सहभाग घेतला. प्रभावी मांडणी, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि उत्कृष्ट वक्तृत्वाच्या जोरावर अश्री केदार हिने प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. तिला वृषाली पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

श्लोक पठण स्पर्धेत सोनाक्षी शिंदे (इयत्ता ८ वी) व राज चेमटे (इयत्ता ९ वी) यांनी सहभाग घेत भारतीय संस्कृती व संस्कारांचे दर्शन घडविले. त्यांना ज्योती चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रॉडक्ट डेव्हलपमेंट स्पर्धेत आशितोष मिश्रा व मयूर गायकवाड तसेच चंदन पाठक व गणेश काळे या दोन गटांनी सहभाग घेतला. नाविन्यपूर्ण कल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि उत्कृष्ट टीमवर्कचे सादरीकरण करत आशितोष मिश्रा व मयूर गायकवाड यांच्या प्रकल्पाने प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. त्यांना ख्याती करंजकर यांचे मार्गदर्शन लाभले.




या यशाबद्दल स्नेहालय संस्थेचे संचालक हनिफ शेख, मानद संचालिका कांचन पापडेजा, मानद सहसंचालिका मंदा हांडे तसेच मुख्याध्यापिका शीतल गुंदेचा यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. व्यवस्थापन, शिक्षकवर्ग आणि पालकांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला.

योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्यांमधील सुप्त प्रतिभा यशात परिवर्तित होऊ शकते, याचा प्रेरणादायी प्रत्यय स्नेहालयच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेतून पुन्हा एकदा दिला.

## देवदर्शनाला गेल्या अन् अर्ध्या तासात घरफोडी

### १५ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र व रोख एक हजार रुपये लंपास

**● पाथर्डी । वीरभूमी–**
शहरातील धामणगाव रोड, महादेव मंदिर परिसरात घराला कुलूप लावून जवळच मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या महिलेच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सुमारे ४६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना ३ सप्टेंबर रोजी अवघ्या अर्ध्या तासात घडली. याप्रकरणी सुंदराबाई नंदुलाल भगत यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

सुंदराबाई भगत या पती व दोन मुलांसह धामणगाव रोडवरील महादेव मंदिर परिसरात राहतात. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता घरातील कामे आटोपून त्या जवळच असलेल्या महादेव मंदिरात दर्शनासाठी गेल्या. सुमारे ११.३० वाजता त्या घरी परतल्या असता घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले व उघडे असल्याचे निदर्शनास आले.




घरात प्रवेश करून पाहणी केली असता लोखंडी कपाटात ठेवलेले १५ ग्रॅम वजनाचे, सुमारे ४५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र तसेच एक हजार रुपयांची रोख रक्कम चोरीला गेल्याचे आढळून आले.

अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# SPOT NEWS

## जुन्या प्रलंबित गुन्ह्यांच्या फाईलींना 'क्लोज'चा धडाका; श्रीगोंदा पोलीस ठाणे कर्जत उपविभागात अव्वल!

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

वर्षानुवर्षे तपासाच्या फेऱ्यात अडकलेल्या प्रलंबित गुन्ह्यांचा धडाधड निपटारा करत श्रीगोंदा पोलिसांनी कर्जत उपविभागात सर्वाधिक गुन्हे निर्गतीचा मान पटकावला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली चालू वर्षात तब्बल ६२० प्रकरणांची निर्गती करण्यात आली असून, या उल्लेखनीय कामगिरीमुळे श्रीगोंदा पोलीस ठाण्याने उपविभागात आपला ठसा उमटवला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दोन महिन्यांपूर्वी पदभार स्वीकारल्यानंतर प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने तपास करून कागदपत्रांची पूर्तता, साक्षीदारांचे जबाब व तांत्रिक पुराव्यांचा योग्य वापर करत गुन्हे निर्गतीला गती दिली. चालू वर्षातील भाग ५ चे २५८, भाग ६ चे ७६, दारूबंदीचे १२७ गुन्हे तसेच अकस्मात मृत्यूची प्रकरणे, अशी एकूण ६२० प्रकरणे निर्गती करण्यात आली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या हस्ते अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या अधिकारी-अंमलदारांनी केली.

## पाथर्डी तालुका क्रीडा समितीच्या अध्यक्षपदी सचिन शिरसाट

**● पाथर्डी । वीरभूमी –**



पाथर्डी तालुक्यातील क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी नुकत्याच झालेल्या क्रीडा शिक्षकांच्या बैठकीत तालुका क्रीडा समितीची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक सचिन शिवाजीराव शिरसाट यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातून स्वागत होत आहे. नूतन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी बाळासाहेब फलके, सचिवपदी राजेंद्र सोनवणे, सहसचिवपदी प्रवीण चोरमले, खजिनदारपदी बाळासाहेब बडे, कोषाध्यक्षपदी रावसाहेब मोरकर आणि प्रसिद्धीप्रमुखपदी श्रीकांत शहाणे यांची निवड झाली. तंत्रस्नेही म्हणून किरण नरसाळे व विनोद ढाकणे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सदस्यपदी मंगेश उदमले, रविंद्र खेडकर आणि राजू सुरवसे यांचा समावेश करण्यात आला आहे. नव्या कार्यकारिणीसमोर तालुक्यातील शालेय व विविध क्रीडा स्पर्धांना चालना देणे, होतकरू खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळवून देणे, आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण भागातील क्रीडा गुणवत्तेला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचे आव्हान आहे. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सचिन शिरसाट यांनी क्रीडा शिक्षक, खेळाडू आणि क्रीडाप्रेमींना सोबत घेऊन विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. तालुक्यात अनेक गुणवंत खेळाडू असून, त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन व सुविधा मिळाल्यास ते जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर चमकू शकतात. या उद्देशाने समितीच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ड. सुरेश आव्हाड, प्राचार्य बबन चौरे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, विशाल गर्जे, कोमल वाकळे, प्रियांका मंडम यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी सचिन शिरसाट व नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## केडगावात साई सच्चरित्र पारायण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

धार्मिक कार्यातून मनाला मानसिक समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळते, तेथेच परमेश्वराचे अस्तित्व अनुभवायला मिळते. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने माणूस आपल्या गावापासून दूर जातो. मात्र नवीन ठिकाणी मंदिराची उभारणी करून सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य ही भारतीय संस्कृतीची मोठी ताकद आहे. भारतीय संस्कृतीने देवाचे स्वरूप निसर्गाशी जोडले असून, अध्यात्मामुळे मन प्रसन्न होते आणि नकारात्मक विचार दूर होतात, असे प्रतिपादन साईकथाकार माधुरीताई शिंदे यांनी केले. केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा फाऊंडेशनच्या साईबाबा मंदिराच्या तेराव्या स्थापना दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त मंदिर परिसरात साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास केडगाव परिसरातील साईभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. साईबाबांनी मानवतेला प्रेम, श्रद्धा, सबुरी आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला.सबका मालिक एक या विचारातून त्यांनी जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीला सर्वोच्च स्थान दिले. गरजूंची सेवा करणे, दुःखी व्यक्तीला आधार देणे आणि प्रत्येक जीवामध्ये परमेश्वर पाहणे, हा साईंच्या शिकवणीचा मुख्य गाभा आहे. साईचरित्राचे वाचन व श्रवण केल्याने मनाला समाधान मिळते, श्रद्धा दृढ होते आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळते, असे माधुरीताई शिंदे यांनी आपल्या प्रवचनातून सांगितले. यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी आणि नागरिक चिंतेत आहेत. त्यामुळे साई सच्चरित्र पारायणाच्या माध्यमातून चांगला पाऊस पडावा, सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी आणि सर्वांचे जीवन आनंदी व्हावे, अशी प्रार्थनाही साईचरणी करण्यात आली.

# नाशिक-पुणे रेल्वे मूळ मार्गानेच करा

### अकोले तालुका रेल्वे कृती समिती व ग्राहक पंचायतीचे तहसीलदारांना निवेदन | काकोडकर समितीच्या कार्यवाहीला विलंबाबाबत नाराजी

**● अकोले । वीरभूमी –**

**नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वेमार्ग मूळ संकल्पित मार्गानेच करण्यात यावा, या मागणीसाठी अकोले तालुका रेल्वे कृती समिती व अकोले तालुका ग्राहक पंचायतीच्या वतीने तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल, असे तहसीलदार मोरे यांनी सांगितले.**



बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी नाशिक, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यांतील रेल्वे कृती समितीची बैठक राजगुरुनगर येथे झाली. या बैठकीत नाशिक-पुणे रेल्वेमार्गाच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. मंजूर असतानाही नारायणगाव येथील खोडदच्या जागतिक जी.एम.आर.टी. प्रकल्पाच्या कारणास्तव रेल्वेमार्गाचा मूळ प्रस्ताव रखडल्याचे सांगण्यात येते. या प्रश्नावर वेळोवेळी आंदोलने व रास्ता रोको करण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर शासनाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. समितीने ६० दिवसांत अहवाल सादर केल्यानंतर निर्णय घेण्यात येईल, असे शासनाकडून सांगण्यात आले होते. मात्र, ३५ दिवस उलटूनही अद्याप जनसुनावणी झालेली नाही. तसेच सात तालुक्यांतील प्रत्येक गावात जाऊन नागरिकांची मते जाणून घेण्याचे समितीने ठरविले असतानाही अद्याप समितीचे सदस्य गावपातळीवर पोहोचले नसल्याने रेल्वे कृती समित्यांमध्ये नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर नाशिक-पुणे रेल्वेमार्गाशी संबंधित सातही तालुक्यांतील तहसील कार्यालयांमध्ये निवेदने देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार अकोले तालुका रेल्वे कृती समिती व ग्राहक पंचायतीच्या वतीने तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी नाशिक, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यांतील रेल्वे कृती समितीचे सदस्य, पत्रकार भाऊसाहेब वाकचौरे, ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष जगदीशशेठ चौधरी, ज्येष्ठ नेते माधवराव तिटमे, सरपंच प्रदीप हासे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख महेश नवले, कवी ज्ञानेश पुंडे, राम रुद्धे, रामदास पांडे, इंजिनिअर वसंतशेठ बाळसराफ, अजित हासे, ॲड. राम भांगरे, सेवानिवृत्त प्राचार्य आदिनाथ सुतार, नरेंद्र देशमुख, कारभारी बंदावणे, आनंदराव वाकचौरे, आप्पासाहेब आवारी, सुमनताई जाधव, एन. टी. कदम, पांडुरंग पथवे, बबनराव तिकांडे, ऋषिकेश देशमुख, राहुल शेटे, शेख नाजीम, रवींद्र मालुंजकर, जालिंदर घोडके, दत्ता शेणकर, प्रकाश मालुंजकर, भाऊसाहेब आभाळे, संतोष नवले, अमित येवले यांच्यासह विविध नागरिक उपस्थित होते.

निवेदनाच्या प्रती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री, खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## श्रीगोंद्यात डीजेवर बंदी; पारंपरिक वाद्येही आवाजाच्या मर्यादेत वाजविण्याच्या सूचना

### गणेशोत्सव, दहीहंडीच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**



आगामी श्रीकृष्ण जयंती, गोपालकाला आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा तहसील कार्यालयात गुरुवारी शांतता समितीची बैठक घेण्यात आली. उत्सव शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन व पोलिसांकडून विविध सूचना देण्यात आल्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर, तहसीलदार सचिन डोंगरे आणि पोलीस निरीक्षक कौशलरामनिरंजन वाघ यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीस पंचायत समिती, नगरपरिषद, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच गणेश मंडळांचे पदाधिकारी, दहीहंडी आयोजक, शांतता समिती सदस्य, मूर्तिकार, वाद्यवृंदाचे सदस्य, प्रतिष्ठित नागरिक व विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आगामी ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जयंती, ५ सप्टेंबर रोजी गोपालकाला आणि १४ सप्टेंबर रोजी गणेशोत्सव साजरा होत असल्याने या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीत गणेश मंडळे व दहीहंडी आयोजकांनी मांडलेल्या विविध सूचना व अडचणी जाणून घेण्यात आल्या. संबंधित विभागांच्या माध्यमातून त्यावर आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार डीजेवर बंदी असल्याने डीजेचा वापर करू नये. तसेच पारंपरिक वाद्येही ध्वनीच्या निर्धारित मर्यादेतच वाजवावीत, अशा स्पष्ट सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या. उत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषण, वाहतूक कोंडी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची आयोजकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस सुमारे ५० ते ६० सदस्यांची उपस्थिती होती. प्रशासन, पोलीस आणि उत्सव आयोजकांच्या समन्वयातून सर्व सण-उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## कोपरगावात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालयाचा शुभारंभ

**● कोपरगाव । वीरभूमी–**



महाराष्ट्रासह गुजरात, छत्तीसगड, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा आदी राज्यांमध्ये २७ हजारांहून अधिक पत्रकार सभासद असलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त संपर्क कार्यालयाचा शुभारंभ गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

जिल्हा सरचिटणीस जनार्दन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास कोपरगाव तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे, तालुका उपाध्यक्ष निवृत्ती शिंदे, कार्याध्यक्ष किसन पवार, शहराध्यक्ष हफिज शेख, विनोद जवरे, स्वप्नील कोपरे, फकीरराव टेके, रवी वाघडकर, सोमनाथ डफळ, संजय लाड, विशाल लोंढे, काकासाहेब खर्डे, दिनेश जोशी, राजेंद्र तासकर, मिलिंद विघे, प्रमोद पवार, सतीश जाधव, कचरू लोहकरे, गहिनीनाथ घुले, अक्षय काळे, योगेश रुईकर, रहीमखा पठाण, राहुल कोळगे, मधुकर वक्ते, महेश गायकवाड, शहाबाज कुरेशी, गोविंद वाकचौरे, सुमित थोरात, गोदामाई प्रतिष्ठानचे आदिनाथ ढाकणे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना विश्वासराव आरोटे म्हणाले, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून व्यवस्था बदलण्याची क्षमता पत्रकारांमध्ये आहे. पारंपरिक पत्रकारितेसोबत सोशल मीडियाच्या आधुनिक युगातील तंत्रज्ञान आत्मसात करून पत्रकारांनी कार्य करावे. तसेच सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठी विविध उपक्रम राबवावेत. कोपरगाव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सुरू झालेले हे संपर्क कार्यालय पत्रकारांच्या परस्पर संपर्कवाढीसाठी उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे यांनी कोपरगाव तालुका पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून संघटना बळकटीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा विश्वास व्यक्त केला.

प्रास्ताविक प्रा. विजय कापसे यांनी केले. त्यांनी संघटनेच्या वतीने तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सचिव विनोद जवरे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, तर शहराध्यक्ष हफिज शेख यांनी आभार मानले.

# अकोले मतदारसंघातील १६,४३० मतदार प्रारूप यादीतून वगळले

### मृत, स्थलांतरित, दुबार नोंदणीसह विविध कारणे | ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करण्याची संधी

**● अकोले । वीरभूमी–**

निवासाच्या ठिकाणी गैरहजर, स्थलांतरित, मृत, अन्यत्र नोंदणी झालेली, दुबार नोंदणी तसेच गणना प्रपत्र भरून न दिल्याने २१६ अकोले (अ.ज.) विधानसभा मतदारसंघातील १६ हजार ४३० मतदार प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आले आहेत, अशी माहिती तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ अंतर्गत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी अकोले विधानसभा मतदारसंघातील सर्व ३०० मतदान केंद्रांच्या प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या. पुनरीक्षणापूर्वी मतदारसंघात २ लाख ६८ हजार ६८१ मतदार होते. प्रारूप यादीत २ लाख ५२ हजार २६१ मतदारांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये १ लाख ३२ हजार ५९६ पुरुष, १ लाख १९ हजार ६५४ महिला आणि एका तृतीयपंथी मतदाराचा समावेश आहे.

वगळण्यात आलेल्या १६ हजार ४३० मतदारांमध्ये निवासस्थानी गैरहजर ७२१, स्थलांतरित ६ हजार ७०८, मृत ५ हजार ४७४, अन्यत्र नोंदणी झालेली किंवा दुबार नोंदणीचे ३ हजार ५०१ आणि गणना प्रपत्र भरून देण्यास नकार दिलेले किंवा अन्य कारणांमुळे २६ मतदारांचा समावेश आहे.

प्रारूप मतदार यादीच्या अनुषंगाने ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. पात्र मतदाराचे नाव प्रारूप यादीत नसल्यास तसेच १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना प्रपत्र-६ व घोषणापत्राद्वारे नाव नोंदणीसाठी अर्ज करता येईल. मतदार यादीतील एखाद्या नावावर आक्षेप असल्यास प्रपत्र-७, तर नाव, पत्ता, वय, लिंग आदी तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी प्रपत्र-८ द्वारे अर्ज करता येईल.

दरम्यान, प्रारूप यादीतील ५ हजार ५६ मतदारांची २००२-२००४ च्या मतदार यादीतील नोंदीशी जुळवणी झालेली नसून, ११ हजार ७५० मतदारांच्या नोंदींमध्ये तार्किक विसंगती आढळल्या आहेत. अशा मतदारांना मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून नोटिसा बजावण्यात येणार आहेत. संबंधित मतदारांनी निवडणूक आयोगाने विहित केलेली किंवा अन्य वैध कागदपत्रे सादर केल्यानंतर पडताळणी करून निर्णय घेण्यात येणार आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघासाठी एक मतदार नोंदणी अधिकारी आणि २३ सहायक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. दावे, हरकती आणि नोटिसींवरील कार्यवाही ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे किंवा नाव वगळण्याबाबत अर्ज करताना चुकीची घोषणा अथवा विधान केल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम ३१ नुसार एक वर्षापर्यंतची शिक्षा, दंड किंवा दोन्ही होऊ शकतात. तसेच विहित कागदपत्रांच्या अभावामुळे अर्ज नाकारल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून नव्याने अर्ज करता येईल किंवा अधिनियमातील कलम २४ नुसार अपील करता येईल.

# शहरास तालुक्यातील अतिक्रमण, बेशिस्त पार्किंगवर पोलिसांचा दणका

### पाथर्डी शहरासह खरवंडी, मिरी येथे विशेष मोहीम | हातगाड्या, टपऱ्या व वाहनांवर दंडात्मक कारवाई

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील अतिक्रमण आणि बेशिस्त पार्किंगमुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन पाथर्डी पोलिसांनी अतिक्रमण व वाहतूक नियंत्रणाची मोहीम हाती घेतली आहे. शुक्रवारी शहरासह तालुक्यातील खरवंडी व मिरी येथे विशेष मोहीम राबविण्यात आली. आंबेडकर चौक, नाईक चौक, कोरडगाव रोड, शेवगाव रोड, अजंठा चौक तसेच राष्ट्रीय महामार्गालगत वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या हातगाड्या, टपऱ्या, फळविक्रेते आणि बेशिस्तपणे पार्क केलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

शहरातील प्रमुख चौक व महामार्गालगत रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे हातगाड्या उभ्या करून व्यवसाय केला जात असल्याने अनेक ठिकाणी वाहतुकीचा मार्ग अरुंद झाला होता. त्यातच रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभी केली जात असल्याने वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अचानक मोहीम राबवून संबंधितांवर कारवाई केली.

पोलिस पथकाने विविध ठिकाणी पाहणी करून वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या. सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्यांविरोधात कलम २८५ अन्वये गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात आली. बेशिस्त पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आल्याने वाहनधारकांमध्ये धावपळ उडाली.

पाथर्डी शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग हा शहरातील प्रमुख वाहतूक मार्ग आहे. मात्र, बाजारपेठेतील अतिक्रमणे आणि रस्त्यालगतचे बेशिस्त पार्किंग यामुळे अनेकदा वाहतुकीचा खोळंबा होतो. विशेषतः गर्दीच्या वेळेत प्रमुख चौकांमध्ये परिस्थिती गंभीर होत असल्याने अपघाताचा धोकाही निर्माण होतो. त्यामुळे पोलिसांच्या या मोहिमेकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

रस्ते हे वाहतुकीसाठी असून, त्यावर अतिक्रमण करून अथवा बेशिस्त पार्किंग करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई केली जाणार असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करून वाहने निर्धारित ठिकाणीच पार्क करावीत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



या कारवाईत शहरात सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहन खंडागळे, प्रशिक्षणार्थी सहायक पोलिस निरीक्षक रेवती भोसले, एएसआय मरकड, हेड कॉन्स्टेबल अमोल घुगे, वाहतूक शाखेचे शिवाजी नागरे व अल्ताफ शेख सहभागी झाले होते. खरवंडी येथे हेड कॉन्स्टेबल राजेंद्र म्हस्के व पोलिस कर्मचारी पोटभरे, तर मिरी येथे हेड कॉन्स्टेबल संभाजी कुसळकर, भगवान टकले, संजय राठोड यांच्यासह पोलिस व होमगार्ड कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरातील प्रमुख रस्ते व चौकांवरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. अतिक्रमण आणि बेशिस्त पार्किंगविरोधातील ही मोहीम सातत्याने राबवावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# सौर पंपातून शेतीला नवी ऊर्जा

## । दिवसा हक्काची वीज मिळाल्याने सिंचनाला मोठी चालना
## । लोडशेडिंगवर मात करून शेतकऱ्यांना दिलासा : डॉ. सुजय विखे पाटील



**● राहाता । वीरभूमी–**

**महाराष्ट्रात सक्षम नेतृत्व आणि शेतकरीहिताचे धोरणात्मक निर्णय असतील, तर शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणता येतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण 'मागेल त्याला सौर पंप' योजनेतून पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा आणि हक्काची वीज मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेली सौर कृषी पंप योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे, असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.**

राहाता तालुक्यातील आस्तगाव गावच्या शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतात बसविण्यात आलेल्या सौर पंपाच्या माध्यमातून सुरू असलेल्या सिंचनाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी महावितरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली. विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून ग्रीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्यात आली. त्याचबरोबर एक पाऊल पुढे टाकत 'मागेल त्याला सौर पंप' योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध होत असून, शेतीला मोठी चालना मिळत आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

आस्तगाव शिवारातील एका शेतकऱ्याच्या शेतात ५ एचपी क्षमतेचा सौर पंप बसविण्यात आला आहे. या पंपाच्या माध्यमातून जवळपास ५ ते १० एकर क्षेत्र ओलिताखाली आणले जात असून, शेतकऱ्याला दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. या भागाला निळवंडे धरणाचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे जलसंपदा मंत्री तथा राहाता मतदारसंघाचे भाग्यविधाते नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांचाही डॉ. विखे पाटील यांनी उल्लेख केला.

पूर्वी दुष्काळी परिस्थितीमुळे या परिसरात शेती करणे अत्यंत अवघड होते. मात्र निळवंडेचे पाणी आणि सौर ऊर्जेच्या माध्यमातून उपलब्ध झालेली सिंचन व्यवस्था यामुळे आज याच परिसरात शेती फुलताना दिसत आहे. धरण क्षेत्रात झालेला पाऊस, निळवंडेचे पाणी, सौर पंप योजना आणि महायुती सरकारच्या धोरणात्मक निर्णयांमुळे शेतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे, असे त्यांनी सांगितले.

**लोडशेडिंगच्या काळात सौर पंप ठरतोय आधार**

काही भागांत वीजपुरवठ्याच्या वेळेत होणारे बदल आणि लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्री वीज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना शेतात जावे लागते, तर अनियमित वीजपुरवठ्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देणे अनेकदा कठीण होते. अशा परिस्थितीत 'मागेल त्याला सौर पंप' योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची ठरत आहे.

सौर पंपामुळे दिवसा सौर ऊर्जेचा वापर करून शेतकरी आपल्या सोयीनुसार सिंचन करू शकतो. त्यामुळे लोडशेडिंग, रात्रीच्या वीजपुरवठ्याची प्रतीक्षा आणि वीजपुरवठ्याच्या अनिश्चिततेवर मात करून पिकांना वेळेवर पाणी देणे शक्य होत आहे. भविष्यात शेतीसाठी ऊर्जेची गरज भागविण्याच्या दृष्टीने सौर पंप हा प्रभावी आणि दीर्घकालीन पर्याय ठरणार आहे.

शेतकऱ्यांना सौर पंप उपलब्ध करून देण्यात महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचेही डॉ. विखे पाटील यांनी कौतुक केले. 'मागेल त्याला सौर पंप' योजनेची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रात होत असून, या कामाची जागतिक स्तरावरही दखल घेतली गेल्याचे त्यांनी नमूद केले.

**ढगाळ वातावरणातही सौर पंप सुरू**

सौर पंपाबाबत काही ठिकाणी गैरसमज आणि अफवा पसरवल्या जात आहेत. सौर पंप केवळ उन्हातच चालतो किंवा ढगाळ वातावरणात काम करत नाही, असा गैरसमज आहे. मात्र आस्तगाव येथे पाहणी केली असता पूर्णपणे ढगाळ वातावरणातही सौर पंप सुरू असल्याचे दिसून आले. या पंपाच्या माध्यमातून स्प्रिंकलरद्वारे शेतीला पाणी दिले जात होते.

त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रत्यक्ष सौर पंपाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधावा, असे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले.

**अनुदानामुळे आर्थिक भार कमी**

'मागेल त्याला सौर पंप' योजनेत शेतकऱ्यांना शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळत आहे. ३ एचपी पंपासाठी साधारण १५ ते २० हजार रुपये, तर ५ एचपी पंपासाठी ३० ते ३५ हजार रुपये शेतकऱ्यांना भरावे लागतात. उर्वरित मोठा खर्च राज्य सरकारकडून करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

शेतकरी समृद्ध झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेची सुरुवात गाव, शेतकरी आणि शेतीच्या समृद्धीतून होते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने सौर पंप योजनेचा लाभ घेऊन दुष्काळमुक्त आणि समृद्ध महाराष्ट्राच्या निर्मितीत सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुती सरकारचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे डॉ. विखे पाटील यांनी आभार मानले. शेतकऱ्यांच्या हितासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या सौर पंप, सिंचन आणि जलसंधारणाच्या विविध योजनांमुळे शेतीला स्थैर्य मिळत असून, शेतकऱ्यांच्या समृद्धीतूनच दुष्काळमुक्त आणि विकसित महाराष्ट्राची वाटचाल अधिक गतिमान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---

# पोहेगाव-सोनेवाडी रस्त्याबाबत ठेकेदार अजूनही निष्काळजी; आ. आशुतोष काळेंनी घेतली दखल : काकासाहेब जावळे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून पोहेगाव-सोनेवाडी-सावळी विहीर रस्त्यासाठी २.२८ कोटी निधी मिळालेला असून या रस्त्याची वर्क ऑर्डर अर्थात कार्यारंभ आदेश ८ ऑक्टोबर २०२४ रोजी देण्यात आला आहे.मात्र अजूनही निष्काळजी ठेकेदाराकडून ह्या रस्त्याचे काम सुरु करण्यात आलेले नसल्याचे आमदार आशुतोष काळे यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्यांनी तातडीने पोहेगाव-सोनेवाडी-सावळी विहीर रस्त्याचे काम सुरु करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता तुळशीराम दहिफळे यांना दिले असल्याची माहिती कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन काकासाहेब जावळे यांनी दिली आहे.



पोहेगाव व सावळीविहीरच्या नागरीकांना शिर्डीला जाण्यासाठी अतिशय जवळचा असणारा पोहेगाव-सोनेवाडी-सावळी विहीर रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे आमदार आशुतोष काळे यांनी या रस्त्यासाठी २.२८ कोटी निधी मंजूर करून आणला. मात्र कार्यारंभ आदेश प्रसिद्ध होवूनही अद्यापपर्यंत सबंधित ठेकेदाराकडून रस्त्याच्या कामास प्रारंभ करण्यात आलेला नाही. त्यामुळे पोहेगाव-सोनेवाडीच्या नागरीकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले होते. आमदार आशुतोष काळे सातत्याने पाठपुरावा करून रस्त्यांसाठी निधी आणून लवकरात लवकर वर्क ऑर्डर प्रसिद्ध होवून कामाला सुरुवात होण्यासाठी शेवटपर्यंत त्यांचे प्रयत्न सुरु असतात. त्या प्रयत्नातूनच पोहेगाव-सोनेवाडी-सावळी विहीर रस्त्याला निधी उपलब्ध करून दिला, वर्कऑर्डर पण निघाली तरी पण रस्त्याचे काम सुरु होत नसल्याकडे काकासाहेब जावळे यांनी पोहेगावच्या एका कार्यक्रमा दरम्यान आमदार आशुतोष काळे यांचे लक्ष वेधले.

त्यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता तुळशीराम दहिफळे यांना नागरीकांना खराब रस्त्यामुळे होणाऱ्या त्रासाची गांभीर्याने काळजी घेवून रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याच्या सूचना दिल्या असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लवकरच काम सुरु करणार असल्याचे उपअभियंता सीताराम दहिफळे यांनी सांगितले आहे. त्यामुळे पोहेगाव-सोनेवाडीच्या नागरीकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असल्याचे काकासाहेब जावळे यांनी सांगितले आहे.

---

# अकोलेत हंगामी डाकपालाकडून १.८४ लाखांचा अपहार

## खातेदारांकडून घेतलेली रक्कम सरकारी खात्यात जमा न करता वैयक्तिक वापरल्याचा आरोप

**● अकोले । वीरभूमी–**

सावरगाव पाट शाखा डाकघरात हंगामी शाखाडाकपाल म्हणून कार्यरत असलेल्या ओंकार गंगाधर तेलंग यांच्यावर खातेदारांकडून बचत खाते, आवर्ती जमा, सुकन्या समृद्धी व मुदत ठेव खात्यांमध्ये जमा करण्यासाठी घेतलेली रक्कम सरकारी खात्यात जमा न करता वैयक्तिक कामासाठी वापरल्याचा आरोप आहे. याप्रकरणी १ लाख ८४ हजार रुपयांच्या सरकारी रकमेचा अपहार केल्याप्रकरणी अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगमनेर उपविभागाचे सहाय्यक अधीक्षक डाकघर संतोष सुरेश जोशी (वय ५७, रा. संगमनेर) यांनी फिर्याद दिली आहे. सावरगाव पाट पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर ३१ मे २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या रिक्त पदावर तेलंग यांची १ जून ते ७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीसाठी हंगामी शाखाडाकपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

फिर्यादीनुसार, २९ सप्टेंबर २०२५ रोजी वार्षिक तपासणीसाठी सावरगाव पाट शाखाडाकघरात गेले असता कार्यालय बंद असल्याचे तसेच तेलंग गैरहजर असल्याचे आढळले. चौकशी केली असता ते आजारी असल्याचे समजले. त्यानंतर त्यांना समशेरपूर येथील डॉक्टर वामन यांच्या दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शाखा डाकघराचा पदभार देवठाण येथील सहाय्यक शाखाडाकपाल दत्ता पवार यांच्याकडे देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पदभार देण्यासाठी शाखेत गेल्यानंतर तेथे कार्यालयीन दप्तर, तारीख छाप आदी साहित्य आढळून आले नाही. त्यामुळे संशय निर्माण झाल्यानंतर डाक निरीक्षक काळू मारुती सदगीर यांच्या मदतीने शाखेच्या आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी करण्यात आली. त्यात बचत खाते, आवर्ती जमा, सुकन्या समृद्धी व मुदत ठेव खात्यांमधील व्यवहारांत अनियमितता आढळल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तपासणीत २९ जुलै २०२५ रोजी दोन वर्षांच्या मुदत ठेवीसाठी ऑनलाइन स्वीकारलेली १ लाख ६० हजार रुपयांची रक्कम तसेच ११ सप्टेंबर २०२५ रोजी दोन सुकन्या समृद्धी खात्यांमध्ये जमा करण्यासाठी घेतलेली प्रत्येकी १२ हजार रुपये, अशी एकूण १ लाख ८४ हजार रुपयांची रक्कम सरकारी खात्यात जमा न करता वैयक्तिक वापरल्याचे निदर्शनास आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी ओंकार तेलंग यांच्याविरुद्ध अकोले पोलिस ठाण्यात सरकारी रकमेचा अपहार व खातेदारांची तसेच पोस्ट खात्याची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

---

# पारनेर रस्ता रुंदीकरणास व्यापाऱ्यांचा स्वयंस्फूर्त पाठिंबा

## प्रशासन-व्यापाऱ्यांच्या बैठकीत एकमत । आवश्यक अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याचे आश्वासन

**● पारनेर । वीरभूमी–**

**देवीभोयरे फाटा-पारनेर-सुपा-सारोळा या राज्य मार्ग क्रमांक ६९ वरील रस्ता रुंदीकरणाच्या कामाला पारनेर शहरातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य करण्याचा एकमुखी निर्णय घेतला. सार्वजनिक बांधकाम विभाग, पारनेर नगरपंचायत प्रशासन आणि व्यापाऱ्यांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे रस्ता रुंदीकरणाच्या कामातील अडथळे दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



रस्ता रुंदीकरणाच्या पार्श्वभूमीवर नगरपंचायत प्रशासनाने शहरातील रस्त्यालगतच्या मालमत्ताधारकांना दि. १ रोजी नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसांबाबत व्यापाऱ्यांच्या मनातील शंका व अडचणी दूर करण्यासाठी नगरपंचायत कार्यालयात विशेष बैठक घेण्यात आली.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुबोध वसईकर, नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे तसेच व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते. यावेळी मालमत्तेची कागदपत्रे, बांधकाम परवानगी, जागेचा नकाशा तसेच रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक बाबींवर प्रशासनाने मार्गदर्शन केले.

मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांनी मालमत्ताधारकांनी ७/१२ उतारा, मालमत्ता पत्रक, मोजणी नकाशा, बांधकाम परवानगी आणि नगरपंचायत नमुना क्रमांक ४३ चा उतारा आदी कागदपत्रे सादर करण्याबाबत माहिती दिली. तसेच मालमत्ता मालक स्वखुशीने रस्त्यासाठी जागा देणार असल्यास संमतीपत्र देण्याची प्रक्रियाही स्पष्ट केली.

बैठकीतील सकारात्मक चर्चेनंतर व्यापाऱ्यांनी प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंजूर डीपीआरनुसार रस्ता रुंदीकरणाचे काम करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेले अतिक्रमण व्यापारी स्वतःहून काढून घेतील, असे बैठकीत ठरले.

प्रशासन आणि व्यापाऱ्यांमध्ये सकारात्मक संवाद झाल्याने त्यांच्या शंकांचे निरसन झाले आहे. त्यामुळे रस्ता रुंदीकरणाच्या कामाला गती मिळण्यास मदत होणार असून, शहरातील वाहतूक व्यवस्थेतही सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

---

# शेवगावातील श्री स्वामी समर्थ केंद्रात रविवारी वधू-वर नावनोंदणी मेळावा; गरजूवंतांनी लाभ घेण्याचे आवाहन

**● शेवगाव । वीरभूमी –**

शेवगावच्या खंडोबा नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने विवाह संस्कार विभागांतर्गत सर्व जातीय-धर्मीय वधू-वर नावनोंदणी मेळाव्याचे आयोजन रविवार (ता.६) रोजी करण्यात आले आहे. सकाळी नऊ ते सायंकाळी चार या वेळेत हा मेळावा होणार आहे.

विवाहासाठी योग्य स्थळ शोधणाऱ्या उपवर मुला-मुलींसाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आज्ञाशीर्वादाने तसेच आबासाहेब मोरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा मेळावा होत आहे. विवाह संस्कार विभागाकडे १८ हजारांहून अधिक सुयोग्य स्थळांची माहिती उपलब्ध असून, इच्छुक वधू-वरांची नावनोंदणी करून त्यांच्या अपेक्षेनुसार स्थळांची माहिती देण्यात येणार आहे.

मेळाव्यात विवाहपूर्व व विवाहोत्तर कौटुंबिक समस्या, विवाहासंदर्भातील अडचणी तसेच विविध प्रश्नांवर समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. केंद्रात याच दिवशी श्री दुर्गा सप्तशती पाठासह विविध सेवा उपक्रम होणार आहेत. विवाहासंदर्भातील अडचणींवर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाणार असून, त्यासाठी इच्छुकांनी कुंडली सोबत आणावी.

नावनोंदणी विनामूल्य आहे. उपवर मुला-मुलींनी येताना बायोडाटा, आधारकार्डची प्रत, एक पासपोर्ट आकाराचा फोटो व कुंडली आणावी. शेतकरी कुटुंबांव्यतिरिक्त इतर क्षेत्रांतील स्थळांची माहितीही उपलब्ध असल्याचे आयोजकांनी सांगितले.

विवाह संस्कार विभागाच्या माध्यमातून सर्व जाती-धर्मीय वधू-वर परिचय मेळावे, सामुदायिक विवाह सोहळे, कमीत कमी खर्चात शास्त्रोक्त विवाह, सुजाण पालकत्व व बालसंगोपनाबाबत मार्गदर्शन तसेच हुंडा, मानपान यांसारख्या अनिष्ट प्रथांच्या निर्मूलनासाठी उपक्रम राबविले जातात.

शेवगाव व परिसरातील सेवेकरी बंधू-भगिनींनी आपल्या कुटुंबातील किंवा नात्यातील उपवर मुला-मुलींची नावनोंदणी करण्यासाठी मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या विवाह संस्कार विभागाने केले आहे.

---

# जायकवाडीच्या हक्काच्या पाण्यासाठी ३२ गावांचा एल्गार

## सर्वपक्षीय एकजुटीचे आवाहन । गावागावांत जनजागृती करून आंदोलनाची दिशा ठरवणार : ॲड. शिवाजीराव काकडे

**● शेवगाव । वीरभूमी –**

जायकवाडी जलाशयातून ताजनापूर उपसा सिंचन योजनेद्वारे शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील ३२ गावांना हक्काचे पाणी मिळावे, तसेच परिसरातील तलाव, बंधारे, नालाबंडिंग व पाणलोट क्षेत्र पाण्याने भरून मिळावे, यासाठी सर्वपक्षीय पाणी परिषद कृती समितीच्या माध्यमातून संघर्ष उभारण्याचा निर्धार करण्यात आला. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून शेतकरी, युवक व महिलांनी पाण्याच्या प्रश्नासाठी एकत्र यावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे यांनी केले.

बोधेगाव येथे पूर्व भागातील ३२ गावांतील शेतकरी, महिला, युवक व ग्रामस्थांची बैठक झाली. यावेळी ॲड. काकडे म्हणाले की, जायकवाडीच्या पाण्यातून ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक १ व २ साठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले आहेत. दुष्काळी भागातील शेतीला पाणी मिळेपर्यंत हा संघर्ष सुरू ठेवावा लागेल. पाणी हाच धर्म आणि जात आहे. पाणी कोणाच्या बापाचे नसून ते आपल्या हक्काचे आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

इतर तालुक्यांकडून पाण्यासाठी प्रयत्न सुरू असताना पूर्व भागातील शेतकऱ्यांनी सावध होऊन संघटित होणे गरजेचे आहे. गावागावांत बैठका घेऊन जनजागृती करण्यात येईल. नियोजनबद्ध पद्धतीने समिती स्थापन करून आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येईल, असे काकडे यांनी सांगितले.

माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे म्हणाल्या की, ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ महिलांच्या मोठ्या सहभागामुळे मंजूर झाली. त्यामुळे पाण्याच्या या लढ्यातही महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. ३२ गावांना भेटी देऊन जनजागृती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### या ३२ गावांचा सहभाग

■ हातगाव, कांबी, बोधेगाव, बालमटाकळी, गायकवाड जळगाव, सुकळी, शेकटे बु., शेकटे खु., बाडगव्हाण, मुरमी, शोभानगर, गोळेगाव, लमानतांडा, नागलवाडी, खडके, मडके, लाडजळगाव, सोनविहीर, ठाकूर पिंपळगाव, चेडे चांदगाव, बेलगाव, सुळे पिंपळगाव, पिंगेवाडी, अंतरवाली खु., कोनोशी, आधोडी, दिवटे, शिंगोरी, राणेगाव, मुंगी, खामपिंपरी व लखमापुरी.



यावेळी जगन्नाथ गावडे, रामनाथ घोरतळे, राम अंधारे, विश्वनाथ कुंढेकर, भाऊसाहेब घोरतळे, भास्कर मासाळ, मिठू काजळे, भगवान बोडखे, माणिक गर्जे, अंबरनाथ बर्डे, लक्ष्मण राठोड, शाहूराव खंडागळे, ज्ञानेश्वर रसाळ, भाऊसाहेब सातपुते, रामनाथ भालेराव, अशोक पातकळ यांच्यासह शेतकरी, युवक व महिला उपस्थित होते.

अंबर बर्डे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन हरी फाटे यांनी केले, तर माणिक गर्जे यांनी आभार मानले.